# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ०१ जुलै,२०२२

**बातमी क्र.०१**

जळगाव दि.01 (प्रतिनिधी) कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील कक्ष अधिकारी श्री. फक्रुद्दीन शेख यांना सेवानिवृत्तीबद्दल गुरुवार दि.३० जून रोजी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली निरोप देण्यात आला.

विद्यापीठ अधिसभागृहात झालेल्या कार्यक्रमात श्री.**फक्रुद्दीन शेख** यांनी केलेल्या सेवेचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, दुर्योधन साळुंखे, अमृत दाभाडे, महेश पाटील व डॉ.मुनाफ शेख यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर श्री.शेख यांनी सत्काराला उत्तर दिले. यावेळी विद्यापीठाच्या वतीने तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, मागावर्गीय शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना,बहुजन कर्मचारी संघटना, उमवि कर्मचारी पतपेढी आणि संशोधन विभाग यांच्या वतीने श्री. शेख यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सुनील पाटील यांनी केले. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.-

**बातमी क्र.०२**

जळगाव दि.०१ (प्रतिनिधी) कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ् शिक्षण आणि अध्ययन विभागाच्या वतीने ५ जुलै पासून जर्मन आणि जापनीज् विदेशी भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे ऑनलाईन पध्दतीने प्रवेश सुरु होणार आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर विविध ठिकाणी असलेल्या रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी या दोन विदेशी भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रमांना प्रारंभ होत आहे. कुलगुरु प्राा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी यासाठी पुढाकार घेतला असून या दोन्ही अभ्यासक्रम ऑनलाईन असणार आहेत. ऑनलाईन जपान भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम (बेसिक लेव्हल एन५) आणि ऑनलाईन जर्मन भाषा प्रमाणपत्र शिक्षणक्रम (बेसिक लेव्हल ए१) असे या दोन्ही शिक्षणक्रमाचे नाव असून www.nmu.ac.in/ideal या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश लिंक उपलब्ध् करुन देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी सर्टिफिकेट प्रोग्राम लिंक वर क्लिक केल्यास अधिक माहिती मिळेल. याशिवाय ०२५७ -२२५७४९५/२२५८४९६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन या विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी